क्र.२/नसवि/महासभा/ ०३ /२०१६-२०१७
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ११ जुलै २०१६

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०३ /२०१६-२०१७

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक १९/०७/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१९/०५/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या सांगली आरोग्य विभागाकडील वाहन चालक या पदावरील कायम कर्मचारी कै.संभाजी गुलाब रजपूत यांचेवर ब्रेन टयुमर या आजारावर एकूण र.रु.३,५१,८६५/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, त्यांच्या वारस पत्नी श्रीमती मथुरा संभाजी रजपूत यांनी वैद्यकीय परिपुर्तीची रक्कम मागणी केली आहे. पैकी ९०% र.रु.३,१६,६७९/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम आदा करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०४/०५/२०१६ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिकेच्या मागासवर्गीय व दलित वस्ती सुधार समिती कडील इमारत निरिक्षक या पदावरील कायम कर्मचारी श्री.आनंदराव शामराव वाघमारे यांना त्यांचे छातीतील असणारी गाठ व मुत्राशयाच्य ठिकाणची दोन्ही बाजूची गाठ शस्त्रक्रियेद्वारे काढणेसाठी एकूण र.रु.१,२७,४४८/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, श्री.वाघमारे यांनी वैद्यकीय परिपुर्तीची रक्कम मागणी केली आहे. पैकी ९०% र.रु.१,१४,७०३/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम आदा करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२०/०५/२०१६ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिकेच्या मिरज आरोग्य विभागाकडील वाहन चालक या पदावरील कायम कर्मचा के.रामचंद्र बापू जाधव यांचेवर हृदयविकाराच्या आजारावर एकूण र.रु.२,१४,०५२/- मात्र वैद्यकि खर्च आला असून, त्यांच्या वारस पत्नी श्रीमती कांचन रामचंद्र जाधव यांनी वैद्यकीय परिपुर्तीची रक्क मागणी केली आहे. पैकी ९०% र.रु.१,९२,६४७/- मात्र वैद्यकिय परिपूर्तीची रक्कम आदा करणे मान्यता देणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२७/०६/२०१६ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अहिल्याबाई होळकर चौकाच्या पूर्वेस रस्ता मंगळवार बाजार मा.गां कॉलनी १०० फुटी रस्ता या एल आकाराच्या मार्गास "आप्पासाहेब काटकर मार्ग" व या मार्गावरी गांधी कॉलनीच्या वळणावर असलेल्या चौकास "आप्पासाहेब काटकर चौक" असे नामकरण करणे महासभेने निश्चित केलेधोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती/सुच मार्गावणेत आल्या होत्या. विहित मुदतीत एकही हरकती/सुचना प्राप्त न झाल्याने, सदर ठिकाण नामकरण करणेस अंतिम मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यां दि.०६/०६/२०१६ चे विषयपत्र.**

८. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.३६ येथे कृष्णा नदीच्या काठावर असणारा पूर्वीच विष्णुघाट वृक्ष असून या घाटाला "तपोवन परिसर" असे नामकरण करणेस महासभेने निश्चित के धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती/सुचना मागविणेत आल्या होत्य विहित मुदतीत एकही हरकती/सुचना प्राप्त न झाल्याने, सदर ठिकाणी नामकरण करणेस अंति मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०६/२०१६ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली येथील हॉटले नटराज ते ऊर्दु हायस्कूल पर्यंत मार्गी जाणाऱ्य रस्त्यास "माजी महापौर के.स्तिफ कुरणे" असे नामकरण करणेस महासभेने निश्चित के धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती/सुचना मागविणेत आल्या होत्य विहित मुदतीत एकही हरकती/सुचना प्राप्त न झाल्याने, सदर ठिकाणी नामकरण करणेस अंति मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०६/२०१६ चे विषयपत्र.**

१०. महानगरपालिकेच्या सांगली पाणी पुरवठा विभागाकडील ट्रॅक्टर ट्रॉली व वॉटर टँकर नागरीकांच्य मागणी नुसार पाणी पुरवठा करणेत येत असलेल्या वॉटर ट्रॉली (३०००लि.) क्षमतेसाठी रु.३००/- व (५००० लि) क्षमतेसाठी रु.४०० प्रमाणे आकारण केली जाते. सदर आकारणी मध्ये (३०००लि. क्षमतेसाठी रु.८००/- व वॉटर फायर टँकरचे (५००० लि.) क्षमतेसाठी रु.४००/- ऐवजी रु.११००/ इतकी प्रती खेपेप्रमाणे वाढ करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली यांचे विषयपत्र.**

११. जिल्ह्यातील बोगस वैद्यकीय व्यवसायीकांविरुद्ध कारवाई करणेकरीता जिल्हा स्तरीय पुनर्विलोकन समिती गठीत करणेत आली असून, सदर समितीचे अध्यक्ष म्हणून मा.जिल्हाधिकारी अहित. त्यांचे अध्यक्षतेखाली बैठकीमध्ये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये असणाऱ्य बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर कारवाई करणेकामी ज्या स्वयंसेवकांनी अथवा नागरीकांनी आरोग्य विभागाकडे माहिती पुर्विलेली आहे त्या माहितीनुसार जर तो वैद्यकीय व्यवसायिक बोगस असलेचे निष्पन्न झाले तर ज्या स्वयंसेवकांने अथवा नागरीकांने माहिती दिली आहे त्या व्यक्तीस महापालिक फंडातून रु.५००/- बक्षिस देणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२५/०६/२०१६ चे विषयपत्र**

१२. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१३. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०३/२०१६-१७

महापालिका सभा दिनांक १९/०७/२०१६ करीता.

मंगळवार दि.१९/०७/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय,सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.पाटील संतोष शिवदास यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या मंजूर अर्थसंकल्पामध्ये महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती पुतळा उभा करणेस तरतुद करणेत आली आहे. त्यानुसार महापालिका क्षेत्रातील त्रिकोणी बाग येथे महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती पुतळा उभा करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.लाटणे किशोर गणपती यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील श्री.हुसेन कोरबू रा.शामरावनगर,सुंदर कॉलनी,भडंग कारखाना पुढे सांगली यांना सन २०१३-१४ मध्ये झालेल्या सायकलिंग या क्रिडा प्रकारामध्ये शिव-छत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार, महाराष्ट्र राज्य पुरस्काराने सन्मानित करणेत आले असून, त्यांचा खेळ प्रकारातील उज्ज्वल यशाची आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन त्यांना महापालिका सेवेत वर्ग -४ या पदावर सामावून घेणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव

३. मा.पाटील संतोष शिवदास यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील ६० फुट रुंदीवरील नविन रस्ते व रस्त्याचे दोन्ही बाजूस गटारी व महत्वाचे नाले बांधणेसाठी महाराष्ट्र नगरोत्थान योजनेतुन निधी प्राप्त होणे करीता शासनाकडे प्रकल्प अहवाल सादर करणे बाबत मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ४०९ दिनांक १४/१२/२०१० अन्वये नियुक्ती केलेल्या सल्लागार अनुक्रमे सी.व्ही.कांड कन्सलटंन्स् पुणे व प्रायमुव्ह इफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेट इंजिनिअरिंग कन्सलटंन्स् पुणे यांचे कडून सर्वेक्षण करुन तयार करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार एकूण रस्त्यांच्या व रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारी व प्रमुख नाले बांधणे एकत्रित रक्कम रुपये २९८.४० कोटी रक्कमेचा प्रस्ताव आहे. त्यास अनुसरुन मा.महासभा ठराव क्रमांक ३५ दिनांक २०/०७/२०१५ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील ६० फुटी रुंदीवरील रस्त्यांची पाहणी करुन सदरची योजना राबविणे कामी सविस्तर अहवाल मान्यतेसाठी फेर सादर करणेस आदेशित केले होते. त्यानुसार नगररचना विभागाकडून विकास योजना आराखडयानुसार महत्वाचे प्रमुख रहदारीचे व विस्तारीत भागाचा विकास होणेस सुलभ होतील असे ६० फुट, ८० फुट व १०० फुट रुंदीचे रस्ते संबंधीत सल्लागार यांचेशी चर्चा करुन एकूण ३८ रस्त्यांची यादी तयार करणेत आली आहे.

सदर योजनेतंर्गत महापालिकेस सर्व साधारण २०० ते २५० कोटी इतका निधी मंजूर होवू शकेल यासाठी महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक सुनिअ २०१०/ प्रक्र.५१०/पापु-२२ दिनांक २२ फेब्रुवारी २०११ परिशिष्ठ २ भांडवली कामाचे अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवाशुल्क तक्त्यातील अ.क्र.७ नुसार १०० कोटी रक्कमेचे प्रकल्प खर्चा पुढील कामास शेकडा २.५०% सेवाशुल्क देणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.दुर्वे शिवाजी बाबूराव यांनी दिलेला प्रस्ताव:-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील अेपी बेकरी ते लोकूर हॉस्पिटल या रस्त्यास प्राध्यापक डॉ.जे.जी.डेव्हीड असे नामकरण करणेबाबत व या नामकरणासाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

५. मा.गायकवाड युवराज शिवाजीराव यांनी दिलेला प्रस्ताव :-

महाराष्ट्र शासनाने गुंठेवारी विकास अधिनियम २००१ गुंठेवारी भागातील नागरिकांना लाभ देण्याकामी कायदा करुन महानगरपालिका क्षेत्रातील २००० पूर्वीच्या सर्व गुंठेवारी प्रस्ताव नियमितीकरणाचे धोरण यापूर्वी मान्य करण्यात आले आहे. पण कायदेशिर, तांत्रिक अडचणी निर्माण करुन गुंठेवारी भागातील नागरिकांचे प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत. त्यामुळे सांगली महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान देखील होत आहे. तसेच, गुंठेवारी नियमितीकरण तरतुदीनुसार करार पत्राद्वारे ताबा पत्र, कब्जापत्र असे कागदपत्राद्वारे गुंठेवारी नियमितीकरण होणेकामी सूचना देणेत येत आहे. यासाठी अधिनियमातील कलम ४ अन्वये गुंठेवारी नियमितीकरणास मार्च २०१७ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

६. मा.पाटील प्रशांत पायगोंडा यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका स्थल सिमेतील कुपवाड प्रभाग समिती क्र.३ हा अतिशय विरळ लोकवस्तीचा व गूंठेवारीचा भाग आहे. या भागातून महापालिकेकडे सन २००२ पासून आजअखेर हजारो गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव नागरिकांकडून दाखल करण्यात आले आहेत. सदर प्रस्तावांसाठी आवश्यक असणाऱ्या मुळ मंजूर रेखांकन फाईल्स् या मिरज विभागीय कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे इकडील कार्यालयामध्ये गुंठेवारी नियमितीकरणाचे कामकाज करताना मुळ मंजूर रेखांकन फाईल अभावी अनेक अडचणी येत आहेत. या मुळ मंजूर रेखांकनाच्या फाईली मिरज विभागीय कार्यालयाकडून ने-आण करणेसाठी बराच कालावधी जात असल्याने गुंठेवारी नियमितीकरणाची प्रक्रिया अतिशय क्लिष्ठ बनत असल्याने, नागरिक इकडील कार्यालयाकडे व मिरज कमालीची नाराजी पसरलेली आहे. तसेच, आता कुपवाड विभागाचे कार्यालय अतिशय विस्तृत बनले असून, या कार्यालयात या मंजूर मुळ रेखांकनासाठी जागा सहज उपलब्ध होणार आहे. जर मुळ मंजूर रेखांकनाच्या फाईली कुपवाड कार्यालयात आणल्यास नागरिकांचा त्रास व वेळ वाचून त्यांची गुंठेवारी नियमितीकरणाची कामे होण्यास मदत होणार आहे. तसेच, कुपवाड प्रभागामधून गूंठेवारी नियमितीकरणाची कामे अतिशय वेगाने होण्यास मदतच होणार आहे. तरी या बाबींचा विचार करता कुपवाड प्रभाग समिती क्र.३ चे कार्यक्षेत्राशी निगडीत असणाऱ्या सर्व मंजूर मुळ रेखांकनाच्या फाईली कुपवाड विभागाकडे सत्वर पाठविणेकामी चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

७. मा.माने शेखर विश्वासराव यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील युवकांना व नागरीकांना व्यायामाची आवड व्हावी तसेच, त्यांचे आरोग्य निरोगी रहावे याकरीता ओपन जीम (खुली व्यायामशाळा) ची संकल्पना मोठ्या शहरांमध्ये होत आहे. आपल्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये अशी प्रकारची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे नागरीकांना खाजगी व्यायाम शाळांमध्ये मोठी फी भरुन व्यायामास जावे लागते. सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही शहरामध्ये प्रायोगिक तत्वावर खुली व्यायाम शाळा (साहित्य) पुरवून त्याचा लाभ नागरिकांना देता येणार आहे. याकरीता शासनाचे नाविन्यपूर्ण योजनेतून अथवा मनपा निधीतून व शहरातील दानशुर व्यक्तीकडून खुली व्यायाम शाळा सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये योजना राबविणेकामी धोरणात्मक निर्णय घेवून मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

८. मा.पाटील संतोष शिवदास यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात अॅमेझोन पार्क होण्यासाठी मा.शासनाकडे पत्रव्यवहार होण्यासाठी तसेच, B.O.T. तत्वावर सदरचे काम करुन घेणेबाबत विचार विनिमय होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

९. मा.पाटील संतोष शिवदास यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाचे अखत्यारीत विविध अपग्रेडेशन,नविनीकरण,वीज बचत व अपारंपारीक ऊर्जा प्रकल्पासाठी तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्त करणेस रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. त्थापि, मा.स्थायी समिती ठराव क्र.५९ दि.०९/०६/२०१६-१५/०६/२०१६ अन्वये उपरोक्त स्वरुपाची कामगिरीचा मोफत प्रकल्प अहवाल तयार करुन देणाऱ्या अनेक संस्था असल्याने अशा प्रकारे मोफत प्रकल्प अहवाल करुन देणाऱ्या संस्थांकडून प्रकल्प अहवाल तयार करुन घेवून, प्राप्त होणारे सर्व अहवाल मा.महासभेकडे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व मा.महासभा मंजूर करेल त्या अहवालानुसार व धोरणानुसार संबंधीत संस्थेकडून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या एल.ई.डी. पद्धतीने विद्युतीकरणाची कामगिरी जाहिर निविदा मागवून करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेस सविस्तर चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१०. मा.बागवान मैनुद्दीन शमशुद्दीन यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील शहर सांगली येथील स.नं.४४२, ४२/१/८ या जमिनीवर महापालिका क्षेत्राच्या मंजूर विकास योजना आराखड्यानुसार लायब्ररी व डिस्पेन्सरी अनुक्रमे आरक्षण क्र.१४५ व १४६ ही आरक्षणे प्रस्तावित आहेत.

सदर स.नं.४४२ पैकी या मिळकती मधील आरक्षित जागेच्या उत्तरेस विद्यमान सांगली सिव्हील हॉस्पिटल सुरु आहे. त्यामुळे डिस्पेन्सरी हे आरक्षण ठेवणे योग्य होणार नाही. तसेच आरक्षित जागेच्या काही भागामध्ये महापालिकेने यापूर्वीचे सांस्कृतिक भवन या इमारतीचे बांधकाम केलेले आहे. त्यामध्ये लायब्ररी विकसीत करता येवू शकते आरक्षणातील उर्वरित क्षेत्रामध्ये महापालिकेची विद्यमान ऊर्दु शाळा नं.२० ची इमारत आहे व काही क्षेत्र शिल्लक आहे. सदर क्षेत्रामध्ये परिसरातील नागरिकांच्या मागणीचा विचार करुन शैक्षणिक सोयीचे दृष्टीकोनातून सदर जागेवर असलेले मंजूर विकास योजनेतील उक्त लायब्ररी व डिस्पेन्सरी आरक्षण क्र.१४५,१४६ या आरक्षणांचा हेतू (ग्रांज) बदलून त्याऐवजी प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ही आरक्षणे प्रस्तावित करणे योग्य होणार आहे.

सबब, याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरफार प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर करणेकामी सविस्तर प्रस्ताव सादर करणेकामी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १५/०७/२०१६.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०५/२०१६

ठराव क्रमांक :- ४७

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि.१९/०५/२०१६ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२३ ते ठराव क्र.४६ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदर कार्यवृत्त कायम करताना ठ.क्र.३१ ला १४ सदस्यांनी विरोध नोंदविला असून त्याची नोंद घेणेत येवून, कार्यवृत बहुमताने कायम करणेत येत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव बहूमताने मंजुर

महापौर,

महासभा लिपीक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ४८

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिके माजी स्थायी समिती सभापती मा.दिलीप रामकृष्ण सुर्यवंशी तसेच, माजी शिक्षण मंडळ सभापती मा.अशोकराव सुर्यवंशी, माजी नगरसेवक श्री.धनंजय सुर्यवंशी यांच्या मातोश्री आणि विद्यमान नगरसेवक मा.धीरज सुर्यवंशी यांच्या आजी कै.आनंदीबाई रामकृष्ण सुर्यवंशी यांचे रविवार दि.१० जुले २०१६ रोजी वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.संतोष शिवदास पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.शिवाजी बाबुराव दुबे महापौर

प्रशासकीय अधिकारी

महापालिका

सांगली ... पालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ४९

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

भिमगर्जना कला क्रिडा सेवा मंडळाचे माजी अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते व महानगरपालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी आनंदराव बाबू व्हनकटे यांचे शनिवार दि.०९ जुलै २०१६ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळ

अनुमोदक :- मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महासभा

प्रशासकिय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ५०

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

दि.१३ जुलै २०१६ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील कोपडी ता.कर्जत येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन तिची हत्या करणेत आली. सदरची घटना ही अत्यंत दु:खद असून, या घटनेचा ही सभा निषेध करीत असून, अशा प्रवृत्तीच्या लोकांना कठोरात कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे.

कर्जत येथील अल्पवयीन मुलीच्या निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा. संतोष शिवदास पाटील

अनुमोदक :- मा.निरंजन सुरेश आवटी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

प्रशासकीय अधिकारी

महापालिकेचे सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ५१

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

महानगरपालिका क्षेत्रातील गावभाग येथील सामाजिक कार्यकर्ते जनसंघाचे पहिले नगरसेवक श्री.दत्ता पाटील यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.युवराज सतिश बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.स्वरदा श्रीरंग केळकर

महापौर.

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ५२

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

महानगरपालिका क्षेत्रातील गावभाग येथील सामाजिक कार्यकर्त्या माजी नगरसेविका कांचनताई देसाई यांचे सोमवार दि.१८ जुलै २०१६ रोजी अल्पशः आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या झालेल्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा. युवराज सतिश बावडेकर

अनुमोदक :- मा.स्वरदा श्रीरंग केळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ५३

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

मा.आमदार श्री.महादेव जानकर यांची महाराष्ट्र राज्याच्या कॅबीनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल तसेच, मा.आमदार श्री.सदाभाऊ खोत यांची महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.आमदार श्री.महादेव जानकर व मा.आमदार श्री.सदाभाऊ खोत यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.विजय वसंत घाडगे

अनुमोदक :- मा.शेखर विश्वासराव माने

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकिय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १५/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ५४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.ना.रामदासजी आठवले यांची सामाजिक न्याय राज्य मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल तसेच, मा.आमदार श्री.महादेव जानकर यांची राज्याच्या पशुसंवर्धन व दुग्ध विकास मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल व मा.आमदार श्री.सदाभाउ खोत यांची राज्याच्या कृषी व पणन राज्य मंत्री पदी निवड झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.ना.रामदासजी आठवले, मा.आमदार श्री.महादेव जानकर व मा.आमदार श्री.सदाभाऊ खोत यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.युवराज सतिश बावडेकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.स्वरदा श्रीरंग केळकर महापौर

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ५५

विषय क्रमांक :-.०२.

अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे सांगली नगरीतील नागरिकांना मोठ्या प्रमाणात समस्यांना तोंड द्यावे लागते. शहरामध्ये ठिक-ठिकाणी पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाले होते. परंतु, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे आयुक्त यांनी वेळीच खबरदारी घेवून रात्री अपरात्री स्वःता रस्त्यावर उतरुन अधिकारी,कर्मचारी व नागरिकांच्या मदतीने आपत्ती व्यवस्थापन करुन नाले,चॅबर्स इ.मोकळे करुन साचलेल्या पाण्यापासून नागरिकांची सुटका केली. त्यांच्या या समयसुचकतेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.शेखर विश्वासराव माने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.वंदना सच्चिदानंद कदम महापौर

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ५६

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही शहराच्या प्रत्येक प्रभागामध्ये अधिकारी,कर्मचारी व सामाजिक संघटनांना हाताशी घेवून स्वच्छता अभियान राबविलेबद्दल महापालिका आयुक्तांचे सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.गौतम संभाजी पवार ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- ९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ५७

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०४/०५/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

,महानगरपालिकेच्या सांगली आरोग्य विभागाकडील वाहन चालक या पदावरील कायम कर्मचारी कै.सभाजी गुलाब रजपूत यांचेवर ब्रेन ट्युमर या आजारावर एकूण र.रु.३,५१,८६५/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, त्यांचे दि.२३/०५/२०१५ रोजी निधन झालेने, त्यांच्या वारस पत्नी श्रीमती मथुरा संभाजी रजपूत यांनी उपचारासाठी आलेल्या र.रु.३,५१,८६८/- मात्र खर्चाचो देयके दि.११/०५/२०१५ रोजीचे अर्जाने प्रतिपूर्ततेसाठी सादर केलेली आहेत.

मा.महासभा ठराव क्र.३२ दि.२०/०४/२००५ अन्वये महापालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र राज्य (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील तरतुद व मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एमएजी/२००५/९/प्र.क्र.१/आ.३, दि.१९/०३/२००५ नुसार ब्रेन ट्युमर आजारपणावर घेतलेल्या औषधोपचाराचे बिल देण्यास धोरणात्मक मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्रीमती रजपूत यांनी सादर केलेल्या वैद्यकीय देयक र.रु.३,५१,८६५/- मात्र वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचेकडून पडताळणी करुन घेवून व जरुर ते प्रमाणपत्र घेवून मा.शासनाचे दि.२९/०७/१९९९ च्या निर्णयानुसार ९०% देय असणारी र.रु.३,१६,६७९/- मात्र रक्कम देय होत आहे.

शासन निर्णयातील तरतुदीच्या अधिन राहून र.रु.१,००,०००/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या परिपूर्तीस मंजूरीचे अधिकार विभाग प्रमुखांना देणेत आलेले आहेत व विहित तरतुदीत न बसणाऱ्या प्रकरणी काही उपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मान्यता दयावयाची असल्यास, अशा प्रकरणी निर्णय घेणेसाठी गठीत केलेल्या समितीपुढे निर्णयार्थ सादर करणेत यावेत असे निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन श्रीमती मथुरा संभाजी रजपूत यांनी मागणी केलेनुसार वैद्यकीय प्रतिपूर्तीची ९०% देय असणारी र.रु.३,१६,६७९/- मात्र अदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

शासन अधिकारी (आस्था) उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

महापालिका सचिव
महापालिका मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ५६

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२०/०५/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या मागासवर्गीय व दलित वस्ती सुधार समिती कडील इमारते निरिक्षक या पदावरील कायम कर्मचारी श्री.आनंदराव शामराव वाघमारे यांना त्यांचे छातीतील असणारी गाठ व मुत्राशयाच्या ठिकाणची दोन्ही बाजूची गाठ शस्त्रक्रियेद्वारे काढणेसाठी एकूण र.रु.१,२७,४४८/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, श्री.वाघमारे यांनी उपचारासाठी आलेल्या र.रु.१,२७,४४८/- मात्र खर्चाची देयके प्रतिपूर्तीसाठी सादर केलेली आहेत

मा.महासभा ठराव क्र.३२ दि.२०/०४/२००५ अन्वये महापालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र राज्य (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील तरतुद व मा.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.एमएजी/२००५/९/प्र.क्र.९/आ.३, दि.१९/०५/२००५ नुसार जननमुत्र आकस्मित आजारपणावर घेतलेल्या औषधोपचाराचे बिल देण्यास धोरणात्मक मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री.वाघमारे यांनी सादर केलेल्या वैद्यकीय देयक र.रु.१,२७,४४८/- मात्र वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचेकडून पडताळणी करुन घेवून व जरुर ते प्रमाणपत्र घेवून शासन निर्णयातील तरतुदीच्या अधिन राहून श्री.आनंदराव शामराव वाघमारे यांनी मागणी केलेनुसार वैद्यकीय प्रतिपूर्तीची ९०% देय असणारी र.रु.१,१४,७०३/- मात्र आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदा मधून होणचा आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर.

प्रशासन अधिकारी (जाहिरात)

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ५९

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२७/०६/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या मिरज आरोग्य विभागाकडील वाहन चालक या पदावरील कायम कर्मचारी कै.रामचंद्र बापू जाधव यांचेवर हृदयविकाराच्या आजारावर एकूण र.रु.२,१४,०५२/- मात्र वैद्यकिय खर्च आला असून, त्यांच्या वारस पत्नी श्रीमती कांचन रामचद्र जाधव यांनी उपचारासाठी आलेल्या र.रु.२,१४,०५२/- मात्र खर्चाची देयके प्रतिपूर्ततेसाठी सादर केलेली आहेत.

मा.महासभा ठराव क्र.३२ दि.२०/०४/२००५ अन्वये महापालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र राज्य (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील तरतुद व मा.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.एमएजी/२००५/९/प्र.क्र.९/आ.३, दि.१९/०५/२००५ नुसार हृदयविकाराचा झटका या आजारावर घेतलेल्या आपधोपचाराचे बिल देण्यास धोरणात्मक मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्रीमती जाधव यांनी सादर केलेल्या वैद्यकीय देयक र.रु.२,१४,०५२ /- मात्र वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचेकडून पडताळणी करुन घेवून व जरुर ते प्रमाणपत्र घेवून शासन निर्णयातील तरतुदीच्या अधिन राहून श्रीमती कांचन रामचंद्र जाधव यांनी मागणी केलेनुसार वैद्यकीय प्रतिपूर्तीची ९०% देय असणारी र.रु.१,९२,६४७/- मात्र आदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमूद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून देणेचा आहे

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक :-

महापौर

प्रशासन अधिकारी (आस्था.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ६०

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०६/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अहिल्याबाई होळकर चौकाच्या पूर्वेस रस्ता मंगळवार बाजार मा.गांधी कॉलनी १०० फुटी रस्ता या एल आकाराच्या मार्गास "आप्पासाहेब काटकर मार्ग" व या मार्गावरील गांधी कॉलनीच्या वळणावर असलेल्या चौकास "आप्पासाहेब काटकर चौक" असे नामकरण करणेस महासभेने निश्चित केलेधोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती/सुचना मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत एकही हरकती/सुचना प्राप्त न झाल्याने, सदर चौकास व मार्गास यापूर्वी नामकरण न झाल्याची प्रशासनाने खात्री करुन घेवून नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ६१

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०६/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.३६ येथे कृष्णा नदीच्या काठावर असणारा पूर्वीचा विष्णूघाट वृक्ष असून या घाटाला "तपोवन परिसर" असे नामकरण करणेस महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती/सुचना मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत एकही हरकती/सुचना प्राप्त न झालयाने, सदर ठिकाणी नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ६२

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०६/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली येथील हॉटेल नटराज ते ऊर्दु हायस्कूल पर्यंत मागी जाणाऱ्या रस्त्यास "माजी महापौर कै.ललिफ कुरणे" असे नामकरण करणेस महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती/सुचना मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत एकही हरकती/सुचना प्राप्त न झाल्याने, सदर तिकाणी नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

अनुमोदक :-

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ८३ दिनांक :- १९/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ६३

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली पाणी पुरवठा विभागाकडील ट्रॅक्टर ट्रॉली व वॉटर टँकर नागरीकांच्या मागणी नुसार पाणी पुरवठा करणेत येत असलेल्या वॉटर ट्रॉली (३०००लि.) क्षमतेसाठी रु.३००/- व (५००० लि) क्षमतेसाठी रु.४०० प्रमाणे आकारण केली जाते. सदर आकारणी मध्ये (३०००लि.) क्षमतेसाठी रु.८००/- व वॉटर फायर टँकरचे (५००० लि.) क्षमतेसाठी रु.४००/- ऐवजी रु.११००/- इतकी प्रती खेपेप्रमाणे वाढ करणेस मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार महापालिकेच्या वॉटर ट्रॉली (३०००लि क्षमतेसाठी रु.४००/- व (५००० लि) क्षमतेसाठी रु.५००/- अशी दर आकारणी करणेस ही सभा मान्यता देत असून, खाजगी टँकरसाठी प्रतिखेप रु.७००/- प्रमाणे पाणी आकारणी करणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे. तसेच, पाणी पुरवठ्यासाठी वॉटर टँकरची अपुरी संख्या विचारात घेता प्रशासनाने नव्याने १५ वॉटर टँकरची खरेदी करावी असे ही सभा सूचित करीत आहे.

सूचक :

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

अनुमोदक :-

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
विभाग सांगली.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ६४

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२५/०६/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

जिल्ह्यातील बोगस वैद्यकीय व्यवसायीकांविरुद्ध कारवाई करणेकरीता जिल्हा स्तरीय पुनर्विलोकन समिती गठीत करणेत आली असून, सदर समितीचे अध्यक्ष म्हणून मा.जिल्हाधिकारी आहेत. त्यांचे अध्यक्षतेखाली बैठकीमध्ये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये असणाऱ्या बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर कारवाई करणेकामी ज्या स्वयंसेवकांनी अथवा नागरीकांनी आरोग्य विभागाकडे माहिती पुरविलेली आहे त्या माहितीनुसार जर तो वैद्यकीय व्यवसायिक बोगस असलेचे निष्पन्न झाले तर ज्या स्वयंसेवकांने अथवा नागरीकांने माहिती दिली आहे त्या व्यक्तीस महापालिका फंडातून रु.५००/- बक्षिस देणेस ही सभा मान्यता देत असून, महानगरपालिका क्षेत्रामध्ये असणाऱ्या बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर कारवाई करणेकामी मा.आयुक्तसो यांनी सक्षम अधिकारी नियुक्त करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

वैद्यकिय आरोग्य अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ६५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या मंजूर अर्थसंकल्पामध्ये महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती पुतळा उभा करणेस तरतुद करणेत आला आहे. त्यानुसार महापालिका क्षेत्रातील त्रिकोणी बाग येथे महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती पुतळा उभा करणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती पुतळा उभा करणेसाठी अनुषंगिक परवानगी घेणेसह पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०

ठराव क्रमांक :- ६६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य लाटणे किशोर गणपती यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील श्री.हुसेन कोरबू रा.शामरावनगर,सुंदर कॉलनी,भडंग कारखाना पुढे सांगली यांना सन २०१३-१४ मध्ये झालेल्या सायकलिंग या क्रिडा प्रकारामध्ये शिव-छत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार, महाराष्ट्र राज्य पुरस्काराने सन्मानित करणेत आले आहे.

श्री.कोरबू यांनी कौटूंबिक आर्थिक परिस्थिती नसताना देखील या खेळ प्रकारासाठी अत्यंत कष्ट घेतल्यानेच त्यांना सदर पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. परंतु त्यांना त्यांचे कुंटूंबाचे पालन-पोषण करणेची जबाबदारी त्यांचेवर असल्याने आणि त्यांना या खेळ प्रकारात ध्येयपूर्ती करणेसाठी त्यांना आर्थिक पाठींब्याची अत्यंत गरज आहे. त्यांना पाठींबा मिळाल्यास ते आपल्या शहराचे व भारताचे नाव उज्ज्वल करतील. यासाठी त्यांना महापालिका सेवेमध्ये सामावून घेतल्यास त्यांना आर्थिक पाठबळ मिळेल.

महानगरपालिका क्षेत्रातील क्रिडा क्षेत्रात शिव छत्रपती पुरस्कार आणि अर्जुन पुरस्कार विजेत्या खेळाडूंना त्यांचे शैक्षणिक गुणवत्तेनुसार महापालिका आस्थापनेवर रिक्त पदावर सरळ सेवेत कायम स्वरुपी नेमूण घेणेबाबत महासभा ठराव क्र.२७१ दि.२०/०३/२००१ अन्वये धोरणात्मक निर्णय झालेला आहे. त्यानुसार यापूर्वी चार शिव छत्रपती पुरस्कार आणि अर्जुन पुरस्कार विजेत्या खेळाडूंना त्यांचे शैक्षणिक गुणवत्तेनुसार महापालिका आस्थापनेवर रिक्त पदावर सरळ सेवेत कायम स्वरुपी नेमूण घेणेत आलेले आहे. त्याचप्रमाणे श्री.हुसेन कोरबू रा.सांगली यांना सायकलिंग या क्रिडा प्रकारामध्ये शिव-छत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार, महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाल्याने, महापालिकेच्या धोरणानुसार श्री.हुसेन कोरबू यांना महापालिका सेवेत सामावून घेणेत यावे व सदर सरळ सेवा भरतीकामी आवश्यकतेनुसार मा.शासनाची खास बाब म्हणून मान्यता घेणेत यावी तसेच, मा.शासनाची मंजूरी प्राप्त होईतोपर्यंत अशी मंजूरी मिळेल या धोरणावर त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार महापालिका सेवेत नेमूण घेणेस मान्यता देत आहे.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१५

ठराव क्रमांक :- ६७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य पाटील संतोष शिवदास यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील ६० फुट रुंदीवरील नविन रस्ते व रस्त्याचे दोन्ही बाजूस गटारी व महत्वाचे नाले बांधणेसाठी महाराष्ट्र नगरोत्थान योजनेतुन निधी प्राप्त होणे करीता शासनाकडे प्रकल्प अहवाल सादर करणे बाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.४०९ दि.१४/१२/२०१० अन्वये नियुक्ती केलेल्या सल्लागार अनुक्रमे सी.व्ही.कांड कन्सलटंन्स् पुणे व प्रायमुव्ह इफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट इंजिनिअरिंग कन्सलटंन्स् पुणे यांचेकडून सर्व्हेक्षण करुन तयार करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार एकुण रस्त्यांच्या व रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारी व प्रमुख नाले बांधणे एकत्रित रु.रु.२९८.४० कोटी रक्कमेचा प्रस्ताव आहे. त्यास अनुसरुन मा.महासभा ठराव क्रमांक ३५ दिनांक २०/०७/२०१५ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील ६० फुटी रुंदीवरील रस्त्यांची पाहणी करुन सदरची योजना राबविणे कामी सविस्तर अहवाल मान्यतेसाठी फेर सादर करणेस आदेशित केले होते. त्यानुसार नगररचना विभागाकडून विकास योजना आराखडयानुसार महत्वाचे प्रमुख रहदारीचे व विस्तारीत भागाचा विकास होणेस सुलभ होतील असे ६० फुट, ८० फुट व १०० फुट रुंदीचे रस्ते संबधीत सल्लागार यांचेशी चर्चा करुन एकुण ३८ रस्त्यांची यादी तयार करणेत आली आहे त्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सदर योजनेतंर्गत महापालिकेस सर्व साधारण २०० ते २५० कोटी इतका निधी मंजूर होवू शकेल यासाठी महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक सुनिअ २०१०/ प्रक्र.५१०/पापु-२२ दिनांक २२ फेब्रुवारी २०११ परिशिष्ठ २ भांडवली कामाचे अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवाशुल्क तक्त्यातील अ.क्र.७ नुसार १०० कोटी रक्कमेचे प्रकल्प खर्चा पुढील कामास शेकडा २.५०% सेवाशुल्क सदर योजना मंजूर झाल्यानंतर व योजनेसाठीचा निधी महापालिकेस प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होवून कामाची बिले आदा करतेवेळी शेकडा २.५०% सेवाशुल्क आदा करणेत येईल या अटीवर सी.व्ही.कांड कन्सलटंन्स् पुणे व प्रायमुव्ह इफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट इंजिनिअरिंग कन्सलटंन्स् पुणे यांची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ६८

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य दुबे शिवाजी बाबूराव यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील अेपी बेकरी ते लोकूर हॉस्पिटल या रस्त्यास प्राध्यापक डॉ.जे.जॉ.डव्हीड असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मा.नगरसचिव

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ६९

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य गायकवाड युवराज शिवाजीराव यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासनाने गुंठेवारी विकास अधिनियम २००१ गुंठेवारी भागातील नागरिकांना लाभ देण्याकामी कायदा करुन महानगरपालिका क्षेत्रातील २००० पूर्वीच्या सर्व गुंठेवारी प्रस्ताव नियमितीकरणाचे धोरण यापूर्वी मान्य करण्यात आले आहे व त्यास वेळोवेळी मुदतवाढ देणेत आलेली आहे. तरीही कायदेशिर, तांत्रिक अडचणी निर्माण करुन गुंठेवारी भागातील नागरिकांचे कित्येक प्रस्ताव अद्याप प्रलंबित असल्याने, प्रशमन शुल्क व विकास शुल्क अभावी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान देखील होत आहे. गुंठेवारी नियमितीकरण तरतुदीनुसार करार पत्राद्वारे, साबा पत्र, कबनापत्र असे कागदपत्राद्वारे गुंठेवारी नियमितीकरण करणेत यावे असे ही सभा सूचित करीत असून, अद्याप प्रलंबित असलेले व अर्ज दाखल न केलेल्या नागरीकांचे गुंठेवारी नियमितीकरणासाठी अधिनियमातील कलम ४ अन्वये गुंठेवारी नियमितीकरणास मार्च २०१७ अखेर मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ७०

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य पाटील प्रशांत पायगोंडा यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका स्थल सिमेतील कुपवाड प्रभाग समिती क्र.३ हा अतिशय विरळ लोकवस्तीचा व गुंठेवारीचा भाग आहे. या भागातून महापालिकेकडे सन २००२ पासून आजअखेर हजारो गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव नागरिकांकडून दाखल करण्यात आले आहेत. सदर प्रस्तावांसाठी आवश्यक असणाऱ्या मुळ मंजूर रेखांकन फाईल्स् या मिरज विभागीय कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे इकडील कार्यालयामध्ये गुंठेवारी नियमितीकरणाचे कामकाज करताना मुळ मंजूर रेखांकन फाईल अभावी अनेक अडचणी येत आहेत. या मुळ मंजूर रेखांकनाच्या फाईली मिरज विभागीय कार्यालयाकडून ने-आण करणेसाठी बराच कालावधी जात असल्याने गुंठेवारी नियमितीकरणाची प्रक्रिया अतिशय क्लिष्ठ बनत असल्याने, नागरिक इकडील कार्यालयाकडे व मिरज कमालीची नाराजी पसरलेली आहे. तसेच, आता कुपवाड विभागाचे कार्यालय अतिशय विस्तृत बनले असून, या कार्यालयात या मंजूर मुळ रेखांकनासाठी जागा सहज उपलब्ध होणार आहे. जर मुळ मंजूर रेखांकनाच्या फाईली कुपवाड कार्यालयात आणल्यास नागरिकांचा त्रास व वेळ वाचून त्यांचे गुंठेवारी नियमितीकरणाची कामे होण्यास मदत होणार आहे. तसेच, कुपवाड प्रभागामधून गुंठेवारी नियमितीकरणाची कामे अतिशय वेगाने होण्यास मदतच होणार आहे. या बाबींचा विचार करुन, कुपवाड प्रभाग समिती क्र.३ चे कार्यक्षेत्राशी निगडीत असणाऱ्या सर्व मंजूर मुळ रेखांकनाच्या फाईली कुपवाड विभागाकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत असून, सदर संचिकासह अनुषंगिक रेकॉर्ड कुपवाड प्रशासकीय इमारत कार्यालयामध्ये ठेवणेची व्यवस्था प्रशासनाने ठेवावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमत मंजुर

महापौर

महापालिका सचिव

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- (७१)

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मर्धील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य माने शेखर विश्वासराव यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील युवकांना व नागरीकांना व्यायामाची आवड व्हावी तसेच, त्यांचे आरोग्य निरोगी रहावे याकरीता ओपन जीम (खुली व्यायामशाळा) ची संकल्पना मोठ्या शहरांमध्ये होत आहे. आपल्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये अशा प्रकारची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे नागरीकांना खाजगी व्यायाम शाळांमध्ये मोठी फी भरुन व्यायामास जावे लागते. सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही शहरामध्ये प्रायोगिक तत्वावर खुली व्यायाम शाळा (साहित्य) पुरवून त्याचा लाभ नागरिकांना देता येणार आहे. याकरीता शासनाचे नाविन्यपूर्ण योजनेतून व मनपा निधीतून व शहरातील दानशुर व्यक्तीकडून, संस्थेकडून खुली व्यायाम शाळा सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये योजना राबविणेकामी धोरणात्मक निर्णय घेवून मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

ओपन जीम (खुली व्यायाम शाळा) ही संकल्पना अत्यंत चांगली असून, महानगरपालिका क्षेत्रातील सर्व ३८ वॉर्डामध्ये सदरची ओपन जीम योजना राबविणेत यावी असे या सभेचे मत असून सुरुवातीस प्रायोगिक तत्वावर मा.शासनाचे जिल्हा नियोजन समिती यांचे नाविन्यपूर्ण योजनेतून तसेच, शहरातील उद्योजक, सेवाभावी संस्था, दानशुर व्यक्ती यांचेमार्फत महापालिकेच्या खुल्या भूखंडावर या क्षेत्रात दर्जेदार व्यायाम साहित्य बनविणाऱ्या कंपन्यांकडून त्यांचे सॅम्पल प्रोडक्ट मागवून व क्वॉलीटीची खात्री करुन दर्जेदार साहित्य पुरवून व व्यायामातील तज्ञ व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाचे मान्यतेने व शर्ती-अटीनुसार खालील ठिकाणी ओपन जीम (खुली व्यायाम शाळा) सुरु करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	ठिकाण
१.	महावीर उद्यान सांगली.
२.	आमराई उद्यान सांगली.
३.	भाई घाट सांगली.
४.	मनपा शाळा क्र.२७ चे पटांगण, सांगली.
५.	महावीर व्यायामशाळा लगतचा खुला भुखंड स.नं.७७४, मेनरोड कुपवाड.
६.	सि.स नं.१९७२ जिल्हापरिषद शाळा, विजयनगर,कुपवाड.
७.	स.नं.५८३ गव्हर्मेंट कॉलनी, नाना-नानी पार्क
८.	डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, मिरज.
९.	मिरज सिव्हील हॉस्पीटल जवळ बसवेश्वर पुतळ्याच्या पिछाडीस, खुला भूखंड, मिरज.

सूचक -

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

अनुमोदक -

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ७२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मर्यादेत खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य पाटील संतोष शिवदास यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात अॅमेझोन पार्क होण्यासाठी मा.शासनाकडे पत्रव्यवहार होण्यासाठी तसेच, B.O.T. तत्वावर सदरचे काम करुन घेणेबाबत विचार विनिमय होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ७३

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य पाटील संतोष शिवदास यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाचे अखत्यारीत विविध अपग्रेडेशन,नांवनीकरण,वीज बचत व अपारंपारीक ऊर्जा प्रकल्पासाठी तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्त करणेस रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. तथापि, मा.स्थायी समिती ठराव क्र.५९ दि.०९/०६/२०१६-१५/०६/२०१६ अन्वये उपरोक्त स्वरुपाची कामगिरीचा मोफत प्रकल्प अहवाल तयार करुन देणाऱ्या अनेक संस्था असल्याने अशा प्रकारे मोफत प्रकल्प अहवाल करुन देणाऱ्या संस्थांकडून प्रकल्प अहवाल तयार करुन घेवून, प्राप्त होणारे सर्व अहवाल मा.महासभेकडे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व मा.महासभा मंजूर करेल त्या अहवालानुसार व धोरणानुसार संबंधीत संस्थेकडून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या एल.ई.डी. पद्धतीने विद्युतीकरणाची कामगिरी जाहिर निविदा मागवून करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेस सविस्तर चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत प्रस्तावावर सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाचे अखत्यारीत एल.ई.डी. प्रकल्प राबविणे तसेच, विविध अपग्रेडेशन,नविनीकरण,वीज बचत व अपारंपारीक ऊर्जा प्रकल्पासाठी बिनामोबदला प्रकल्प अहवाल तयार करुन इस्को मोड मध्ये एल.ई.डी. दिवे पुरविणे व बसविणेकामी विद्युत सल्लागार / मक्तेदार नियुक्त करणेकामी प्रकल्प अहवाल तयार करणेस व महानगरपालिका क्षेत्रातील एल.ई.डी. पद्धतीने विद्युतीकरणाची कामगिरी जाहिर निविदा प्रसिद्ध करुन प्रस्ताव मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१५

ठराव क्रमांक :- ७४

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य बागवान मैनुद्दीन शमशुद्दीन यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील शहर सांगली येथील स.नं.४४२, ४२/१/८ या जमिनीवर महापालिका क्षेत्राच्या मंजूर विकास योजना आराखड्या-नुसार लायब्ररी व डिस्पेन्सरी अनुक्रमे आरक्षण क्र.१४५ व १४६ ही आरक्षणे प्रस्तावित आहेत.

सदर स.नं.४४२ पैकी या मिळकती मधील आरक्षित जागेच्या उत्तरेस विद्यमान सांगली सिव्हील हॉस्पिटल सुरु आहे. त्यामुळे डिस्पेन्सरी हे आरक्षण ठेवणे योग्य होणार नाही. तसेच आरक्षित जागेच्या काही भागामध्ये महापालिकेने यापूर्वीचे सांस्कृतिक भवन या इमारतीचे बांधकाम केलेले आहे. त्यामध्ये लायब्ररी विकसीत करता येवू शकते आरक्षणातील उर्वरित क्षेत्रामध्ये महापालिकेची विद्यमान उर्दु शाळा नं.२० ची इमारत आहे व काही क्षेत्र शिल्लक आहे. सदर क्षेत्रामध्ये परिसरातील नागरिकांच्या मागणीचा विचार करुन शैक्षणिक सोयीचे दृष्टीकोनातून सदर जागेवर असलेले मंजूर विकास योजनेतील उक्त लायब्ररी व डिस्पेन्सरी आरक्षण क्र.१४५,१४६ या आरक्षणांचा हेतू (प्रयोजन) बदलून त्याऐवजी प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ही आरक्षणे प्रस्तावित करणे योग्य होणार आहे.

सबब, याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उपरोक्त प्रमाणे फेरफार प्रस्ताव प्रशासना मार्फत मा.शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. जरिना बागवान ठराव सर्वानुमते मंजूर

महापालिका सचिव,
सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिका

अनुमोदक :- मा.संतोष पाटील. महापौर.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ७५

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (महिला व बालकल्याण विभाग) यांचे दि.२०/०७/२०१६ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तरतुदीनुसार ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महाराष्ट्र शासनाकडून ग्रामीण भागासाठी झेडपीए २०१३/प्र.क्र.७६/पंरा-१ दि.२४ जानेवारी २०१४ अन्वये मुद्दा क्र.१ ते १८ मधील मुद्दा क्र.१६ मध्ये ग्रामीण भागातील महिलांसाठी या योजनेतर्गत विविध कार्यक्रम राबविले जातात. त्याचप्रमाणे शहरी भागासाठी तसेच, नागरी वस्तीसाठी मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००५ प्र.क्र.१५६: ०५/नवि-२० दि.३० डिसेंबर २००६ अन्वये १ ते २९ मुद्दयाबाबतची योजना राबविल्या जातात.

मा.शासन निर्णय क्रमांक झेडपीए २०१३/प्र.क्र.७६/पंरा-१ दि.२४ जानेवारी २०१४ अन्वये मुद्दा क्र.१६ मधील पिठाची गिरणी,सौर कंदिल,शिलाई मशीन,पिको फॉल मशीन असे साहित्य पुरविणेस जास्तीत जास्त प्रती महिला र.रु.२०,०००/- पर्यंत खर्च करणेस तसेच, प्रत्येक लाभार्थ्यांचा १०% सहभाग घेणेत येवून, जमा होणाऱ्या लाभार्थी हिस्सामधून साहित्य खरेदी करणे या योजनेच्या अंमलबजावणीसाठी लाभार्थी मिळणेच्या अनुषंगाने प्रसिद्धी देवून, अर्ज मागवून त्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबातील पात्र महिलांना या योजनेचा प्राथम्याने लाभ देणे. जर, दारिद्र्य रेषेखालील महिला लाभार्थी पुरेशा प्रमाणात न मिळाल्यास रु.५०,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थ्यांना महिला व बाल कल्याण समितीच्या मान्यतेने या योजनेचा लाभ देण्यात यावा. महापालिका क्षेत्रामध्ये सदरची योजना कार्यान्वित होणेसाठी मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांनी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे. सदर योजना राबविणेस मा.शासन निर्णयानुसार मा.महासभेचे धोरण ठरविणे आवश्यक असल्याने, मा.शासन मान्य योजनेपैकी फक्त रु.१०,००,०००/- मर्यादेपर्यंत योजनेस मान्यता देणे व योजना राबविणेचे अधिकार मा.आयुक्तसो यांचे राहतील. रु.१०,००,०००/- रक्कमे वरील योजनेस आर्थिक मर्यादा येत असल्याने, त्यासाठी मा.आयुक्त,महिला व बालकल्याण विकास,पुणे यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने महापालिका क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबातील पात्र महिलांना तसेच, दारिद्र्य रेषेखालील महिला लाभार्थी पुरेशा प्रमाणात न मिळाल्यास रु.५०,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करुन, शिलाई मशिन खरेदी करणेस व त्याकामी येणारे अनुषंगिक र.रु.१०,००,०००/- पर्यंतच्या खर्चास ही सभा मान्यता देत असून, सदर योजनेचा लाभ देणेसाठी महिला व बालकल्याण समितीच्या मान्यतेने पात्र लाभार्थी निश्चित करुन, शिलाई मशिन वाटप करणेस पुढील योग्यती कार्यवाही प्रशासनाने ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक :-

महापौर.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १९/०७/२०१६

ठराव क्रमांक :- ७६

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तरतुदीनुसार ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज हायस्कूलचे पटांगण श्री.विजयराव शिवाजीराव धुळूबुळू यांनी त्यांचे मुलाचे विवाह निमित्त दि.२४ डिसेंबर २०१६ रोजी भाड्याने मिळणेस मागणी केली आहे. त्यानुसार श्री.विजयराव शिवाजीराव धुळूबुळू यांचे मागणी प्रमाणे दि.२४ डिसेंबर २०१६ रोजी मुलाचे विवाह निमित्त नियमाप्रमाणे भाडे भरुन घेऊन मिरज हायस्कूलचे पटांगण भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका